Vol 6 Issue 11 Dec 2016

ISSN No : 2230-7850

International Multidisciplinary Research Journal

# Indian Streams Research Journal

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Dr. T. Manichander

Mr. Dikonda Govardhan Krushanahari
Professor and Researcher ,
Rayat shikshan sanstha's, Rajarshi Chhatrapati Shahu College, Kolhapur.

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.org**

Indian Streams Research Journal

ISSN: 2230-7850 Impact Factor : 4.1625(UIF) Volume - 6 | Issue - 11 | December - 2016

# छत्रपती शिवाजी महाराज आणि पोर्तुगीज संबंध

डॉ. एस. पी. खिलारी
सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग , रा. ब. नारायणराव बोरावके महाविद्यालय, श्रीरामपूर.



### प्रस्तावना :–

छ. शिवाजी महाराजांनी सन १६४६ पासून स्वराज्याच्या विस्तारास सुरूवात केली. त्यावेळी त्यांच्या प्रदेशाच्या सिमालगत असणाऱ्या स्वदेशी आणि परकिय सत्तांनी चिंता व्यक्त केली. स्वराज्याच्या निर्मितीसाठी त्यांनी अनेक वतनदार देशमुख, देशपांडे यांना आपलेसे करून घेतले. परंतु काहींनी त्यांच्या या प्रयत्नांच्या विरोधात भूमिका घेतली. याचवेळी सिद्धी, पोर्तुगीज, इंग्रज, विजापुरची आदिलशाही गोवळकोंडयाची कुतुबशाही या परकीय सत्ता होत्या. शिवाजीराजांनी घेतलेल्या या भूमिकेमुळे त्यांना चिंता वाटत होती. कारण शिवाजीराजांचे राज्य असेच वाढत गेले तर आपल्या राज्याला धक्का बसेल. त्यामुळे शिवाजीराजांना जसा विरोध करता येईल तसा विरोध करण्याचा प्रयत्न त्यांनी केला.

### अभ्यास महत्त्व :–

या लेखामध्ये तात्कालीन परकीय सत्तामध्ये शिवाजी व पोर्तुगीज संबंध आधोरेखिपत केले आहेत. शिवाजी राजांचे तत्कालीन परकीय सत्तांशी संबंध होते. परंतु त्यात पोतृगीजाबरोबर असलेल्या संबंधाचे वेगळेपण या लेखात मांडले आहे. त्याचा उपयोग विद्यार्थी, इतिहास, शिक्षक व इतिहास संशोधक यांना होईल.

### उद्दिष्टे :–

१.शिवाजीराजांचे पोर्तुगीजांच्या संदर्भात धोरण जाणून घेणे.
२.शिवाजीराजे आणि पोर्तुगीज संघर्षाची कारणे जाणून घेणे.
३.शिवाजीराजांचे स्वराज्य विस्ताराचे धोरण अभ्यासणे.

सन १६५६ मध्ये शिवाजीराजांनी जावळीचा प्रांत जिंकला तेव्हा गोव्याचा पोर्तुगीज व्हाईसरॉय आपल्या बादशाहाला ५ मे १६५८ रोजी पत्र लिहून शिवाजीचा उल्लेख 'शहाजीचा एक मुलगा' म्हणून करतो. त्यावेळी शिवाजी राजांनी आपले आरमार उभारले होते. आपली लढाऊ गलबते, कल्याण, भिवंडी, पनवेल या ठिकाणी बांधली होती. त्यामुळे पोर्तुगीजांना दहशत निर्माण झाली. शिवाजी राजे कोकण किनाऱ्यावर आपले वर्जस्व निर्माण करतील व किनार–पट्टीवर आपली आरमारी सत्ता प्रस्थापित करतील. त्यामुळे आपल्या व्यावसायास धक्का पोहोचेल व आपले वर्चस्व संपुष्टात येईल म्हणून शिवाजी राज्यांची जहाजे बंदराबाहेर येऊन न देण्याच आदेश व्हाईसरॉयने दिले. परंतु त्याची अंमलबजावणी झाली नाही. कारण पोर्तुगीजांच्या मनात शिवाजी राजाबद्दल धास्ती होती.[१] गोव्याच्या गर्व्हनरच्या एका पत्रामध्ये (मे १६६२) दाभोळ येथील सुभेदार रंगो बल्लाळ यास शिवाजी राजांची पाच लढाऊ गलबते व एक लहान तारू कारंज्याच्या नदीत अडकून पडलेली आहेत. त्यास समुद्राकडे निघण्यास वाट करून दयावी अशी विनंती केली आहे. त्यावेळी गर्व्हनरने आपल्या अधिकाऱ्यास सूचना केली होती की, एखादा धैर्यवान इसमास शोधून त्याच्याकडून गुप्तपणे तारवास आग लावण्याचे काम करावे.[२] सन १६६७ मध्ये पोर्तुगीज अधिकाऱ्यांनी आपल्या राज्यास कळविले की, शिवाजीराजांचे नौदल मला भितीदायक वाटते. कारण त्याच्या विरूद्ध सुरूवातीस कारवाई न केल्यामुळे त्याने किनाऱ्यावर किल्ले बांधले. त्याच्याकडे आता अनेक तारवे आहेत. पण ती मोठी नाहीत.[३] शिवाजीराजांच्या आरमारामध्ये गलबतांचा जास्त भरणा होता. तारवे लहान परंतु जलद धावणारी होती. त्यामुळे पोर्तुगीजाच्या मोठया तारवापासून त्याचे संरक्षण सहज होत असे. शिवाजीराजांची तारवा मलबार किंवा भारताच्या इतर भागातील व्यापारी तारवास लुटीत किंवा पकडून नेत. युरोपियनांच्या लढाऊ तारवास ती त्रास देत नसत. असे शिवाजीराजांचे चरित्रकार कोस्मि–द–ग्वार्द यांनी लिहिले आहे.

शिवाजीराजे व पोर्तुगीज यांचे सलोख्याचे संबंध फार दिवस टिकले नाहीत. कारण शिवाजीराजांनी कुडाल व लखन सावंताकडून जिंकून घेतल्यावर सावंत पोर्तुगीज प्रदेशात राहून त्रास देत असे. हे कळताच शिवाजीराजांनी बारदेशावर स्वारी केली. या स्वारीत देसायांचा पाठलाग करीत त्यांनी बरीच गावी लुटली व जाळली, गोव्याच्या व्हाईसरॉयला न जुमानता १२०० इसमांना कैद करून आपल्या बरोबर नेले. स्वराज्याची सिमा गोव्याच्या प्रदेशाला भिडल्याने पोर्तुगीजाची धार्मिक जुलमी कृत्ये त्यांच्या दृष्टीस पडू लागली. तेव्हा शिवाजीराजांच्या सैन्याने तीन पाद्रयास व काही इसमास ठार मारल्याचे उच रिपोर्टमध्ये म्हटले आहे.[४]
शिवाजीराजांनी बारदेशावर स्वारी केल्याने पोर्तुगीज व्हाईसरॉय व्हिन्सेंटने शिवाजीराजांबरोबर तह केला. या तहावर शिवाजीराजांनी ११ डिसेंबर १६६७ रोजी शिक्कामोर्तब केले. त्यानुसार १) बारदेशातून नेलेले स्त्रिया मुळे यांना खंडणी न देता सोडून दयावे. २) बालघाटातून आलेला माल शिवाजी राजांनी अडवू नये. ३) सागर व भूमीवर

दोघात स्नेह राहवा असा तह झाला. तरीही देसाई बंधू स्वस्थ बसले नाही. तहातील कलमे न जुमानता कुडाल प्रदेशात दंगे करण्याचा प्रयत्न केला. तेव्हा ती बाब गोव्याच्या व्हाईसरॉयच्या नजरेस आणून दिली. तेव्हा व्हाईसरॉयने दोघांनाही या प्रदेशातून जाण्यास सांगितले आहे असे कळविले.[५]

शिवाजीराजांना पोर्तुगीजांचे गोव्यातून उच्चाटन करावयाचे होते. त्याचे मुख्य कारण म्हणजे पोर्तुगीजांचे हिंदू जनतेबद्दलचे जुलमी व धर्मद्वेष असलेले धोरण त्यासाठी डचांना जवळ करून पोर्तुगीजांना धडा शिकविण्याचा शिवाजीराजांचा बेत होता.[६] सन १६६९ मध्ये त्यांचा जंजिराच्या सिद्धीशी संघर्ष सुरू झाल्याने पोर्तुगीजाकडे लक्ष देण्यास फुरसत राहिली नाही. संधी मिळेल तेव्हा पोर्तुगीज सिद्धीला मदत करतील या कारणामुळे ऑक्टोबर १६७० मध्ये दमणजवळ मराठा आरमाराने पोर्तुगीजांचे एक मोठे जहाज पकडून दाभोळ बंदरात नेवून ठेवले. परिणामी पोर्तुगीजांनीही मराठयाची गलबते पकडून वसईत नेली. शेवटी उभयतात पुन्हा तह होवून तात्पुरता संघर्ष मिटला.[७] सन १६७४ मध्ये झालेल्या शिवराज्यभिषकाचे वर्णन इंग्रज वकील हेन्री ऑक्झीडन. वेंगुर्ल्याचे उच व्यापारी यांनी केले आहे. परंतु गोवेकर पोर्तुगीजांनी मात्र या संदर्भात कुठेही लिहिले नाही. सन १६६९ ते १६७७ पर्यंत गोवेकर पोर्तुगीज व शिवाजीराजे यांचा पत्रव्यवहार आढळत नाही. यावरून पोर्तुगीज शिवाजीराजांचा द्वेष करीत होते हे दिसून येते.

शिवराज्यभिषेकाच्या दुसऱ्या वर्षी (१८ एप्रिल १६७५) ला शिवाजीराजांनी फोंडा किल्ल्यास वेढा दिला. त्यावेळी शिवाजीराजांनी पोर्तुगीजांकडे फोंडयाचा किल्लेदार अहमदखान यास मदत न करण्याचे वचन घेतले होत. परंतु पोर्तुगीजांनी फोडयात गुप्तपणे मदत पुरविली. त्यामुळे वेढा चालू असतांना मराठयांनी पोर्तुगीजाच्या ताब्यातील चांदर या गावावर हल्ला केला. घरे लुटली, चर्चेच्या एका नोकरास ठार केले. १६ मे ला फोंडा किल्ला मराठयांनी जिंकून घेतला. त्यामुळे कारवार अन्नुज, अष्टाग्राह, हेमाडबासे, बाली, चंद्रवाडी व काकुडे हा प्रदेश मराठयांच्या वर्चस्वाखाली आला. अशारितीने शिवाजीराजांनी घाटाखाली मिरजनच्या नदीपर्यंत विजापुरी सर्व प्रदेश जिंकून घेतले. फोंडाच्या किल्ल्याची दुरूस्ती करून त्रिंबक पंडित यास फोंडयाचा सुभेदार नेमले.

शिवाजीराजांना फोंडे किल्ला जिंकल्यावर गोवा जिंकणे कठीण नव्हते. ७ मे १६७५ रोजी शिवाजीराजा आता कारवारप्रांतांचा स्वामी झाला असून त्याची पुढची स्वारी गोव्यावर होऊ शकते ही माहिती इंग्रजी पत्रात आहे. परंतु याचवेळी मराठयांना मोगलाशी लढाऊ लागणार होते. त्यामुळे शिवाजीराजांनी पोर्तुगीजांशी युद्ध करण्याचे टाळले. शिवाजी राजे पोर्तुगीजांचा द्वेष करत असे. वेंगुर्ले येथील डचांनी लिहिले आहे.[८]

थोडक्यात शिवाजीराजे व पोर्तुगीज शिवाजीराजांना सतत शत्रू म्हणून पाहत होते. आपली सत्ता मजबूत व्हावी लोकांचे समर्थन मिळावे म्हणून पोर्तुगीजांनी शिवपूर्वकाळापासून अनेक हिंदूना खिश्चन धर्मांची दिक्षा दिली. पोर्तुगीजांचे जुलमी धोरण शिवाजीराजांना मान्य नव्हते. शिवाजीराजांच्या स्वराज्याच्या सिमा गोव्यापर्यंत जावून भिडल्याने पोर्तुगीजांना मराठयांची सतत धास्ती होती. पोर्तुगीजांच्या मते युद्धकाळापेक्षा शांततेच्याप्रसंगी शिवाजीराजा अधिक भितीदायक होता. गोव्यातून पोर्तुगीजांना हाकलून लावणे सहज शक्य होते. परंतु परिस्थितीमुळे त्यांना ते शक्य झाले नाही. दोघांच्या प्रदेशाच्या सिमा एकमेकांच्या प्रदेशाला भिडल्याने त्यांच्या मनात एकमेकांविषयी द्वेष होता. पोर्तुगीज मराठयांना उघड उघड संघर्ष करण्याचे टाळत. परंतु इंग्रज, सिद्धी, सावंत यांना कोणत्याना कोणत्या निमित्ताने मदत करत. त्यामुळे शिवाजीराजेही पोर्तुगीजांच्या विरोधात भूमिका घेत. त्याच्यातील संघर्ष हा टोकाचा होत नसला तरी पोर्तुगीजांच्या मनात मात्र शिवाजींच्याविषयी धास्ती बसली होती हे मात्र नक्कीच म्हणावे लागेल.

*संदर्भ :–*

१.भावे वा.कृ. (१९७०) युग प्रवर्तक शिवाजी महाराज, प्रकाशक य. ना. भावे सदाशिव पेठ, पुणे ०२.
२.डॉ. विसुर्लेकर पांडुरंग (मे १९६७) पोर्तुगीज मराठी संबंध, प्रकाशक व गोळे, कार्यवाह पुणे विद्यापीठ.
३.डॉ. विसुर्लेकर पांडुरंग (मे १९६७) पोर्तुगीज मराठी संबंध, प्रकाशक व गोळे, कार्यवाह पुणे विद्यापीठ.
४.डॉ. विसुर्लेकर पांडुरंग (मे १९६७) पोर्तुगीज मराठी संबंध, प्रकाशक व गोळे, कार्यवाह पुणे विद्यापीठ.
५.डॉ. विसुर्लेकर पांडुरंग (मे १९६७) पोर्तुगीज मराठी संबंध, प्रकाशक व गोळे, कार्यवाह पुणे विद्यापीठ.
६.भावे वा.कृ. (१९७०) युग प्रवर्तक शिवाजी महाराज, प्रकाशक य. ना. भावे सदाशिव पेठ, पुणे ०२.
७.भावे वा.कृ. (१९७०) युग प्रवर्तक शिवाजी महाराज, प्रकाशक य. ना. भावे सदाशिव पेठ, पुणे ०२.
८.डॉ. विसुर्लेकर पांडुरंग (मे १९६७) पोर्तुगीज मराठी संबंध, प्रकाशक व गोळे, कार्यवाह पुणे विद्यापीठ.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.org